**ठळक बातम्या**

- माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या शतकमहोत्सवी जयंतीनिमित्त देशाची आदरांजली
- देशभरातल्या अटल सुशासन भवनांच्या पायाभरणीसह विविध विकासकामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन आणि लोकार्पण
- नक्षलवादाविरोधात निकराची लढाई करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला निर्धार

**आणि**

- नाताळ सणाचा सर्वत्र उत्साह

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची शतक महोत्सवी जयंती आज साजरी होत आहे. या निमित्तानं दिल्लीत सदैव अटल या त्यांच्या समाधीस्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुष्पांजली अर्पण करून, अटलजींच्या स्मृतिंना अभिवादन केलं. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, अटलजींच्या दत्तक कन्या नमिता भट्टाचार्य यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत राजभवन येथे अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयीजी यांना जयंतीदिनी कोटी कोटी

वंदन अशा संदेशातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाजपेयी यांना आदरांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशातून वाजपेयी यांना अभिवादन केलं आहे.

राज्यात इतरत्रही वाजपेयी यांना विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात आली.

धाराशिव इथल्या लोकसेवा समितीच्या वतीने देण्यात येणारे पुरस्कार आज वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. हे पुरस्कार समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या सेवावृत्तींना दिले जातात. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त रत्नागिरीचे प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी राहुल गायकवाड यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><><>**

अटलजींच्या जयंतीनिमित्त सुशासन आज दिवस आज पाळला जात आहे. परंतु भाजपा सरकारसाठी सुशासन ही संकल्पना एका दिवसापुरती मर्यादित नसून तीच सरकारची खरी ओळख असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मध्य प्रदेशात खजुराहो इथं आयोजित कार्यक्रमात देशभरात एक हजार,१५३ अटल ग्राम सुशासन भवनांची पायाभरणी आज प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते झाली.त्यावेळी ते बोलत होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या समृतीप्रीत्यर्थ एका टपाल तिकिटाचं तसंच विशेष नाण्याचं प्रकाशनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पातल्या पहिल्या नदीजोडणीच्या कामाची पायाभरणी मोदी यांच्या हस्ते झाली. मध्य प्रदेशात केन आणि बेतवा या दोन नद्यांची जोडणी करण्यात येणार आहे. या

विविध विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

पंडित मदनमोहन मालवीय यांची १६३ वी जयंती आज देशभरात सर्वत्र साजरी करण्यात येत आहे. भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं त्यांना गौरवण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पंडित मालवीय यांना आदरांजली वाहिली आहे. स्वातंत्र्य संग्रामात  त्याचप्रमणे शिक्षणक्षेत्रात  पंडित मालवीय  यांचं अमूल्य योगदान होतं, आणि त्यांचं कार्य नेहमीच प्रेरणादायी राहील  असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर दरम्यान अनिवासी भारतीयांच्या एनआरआय खात्यांमधल्या ठेवींचा ओघ वाढून तो  ११  अब्ज ९० कोटी डॉलर्सवर  पोहोचल्याचं भारतीय रिझर्व  बँकेनं जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत म्हटलं आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ही रक्कम जवळजवळ दुप्पट असल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

एनएचएआय, अर्थात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्ते सुरक्षा वाढविण्यासाठी आणि प्राण्यांशी संबंधित अपघात टाळण्यासाठी राष्ट्रीय महामार्गां लगत भटक्या जनावरांसाठी निवारा छावण्या  उभारण्याचा पथदर्शी प्रकल्प प्रायोगिक तत्वावर हाती घेतला आहे. राष्ट्रीय महामार्गांलगत वावरणाऱ्या भटक्या पशूंची काळजी आणि व्यवस्थापन, तसंच  प्रवाशांना

अधिक सुरक्षित प्रवासाचा अनुभव देणं, हे याचं उद्दिष्ट असल्याचं एनएचएआय नं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

देशात विविध ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांवर हा प्रकल्प राबवला जाईल.

<><><><><>

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा आज दहा हजारांपेक्षा जास्त नवीन प्राथमिक बहुउद्देशीय सहकारी संस्था, दुग्धविकास आणि मत्सव्यवसाय सहकारी संस्थांचं लोकार्पण करणार आहेत. दिल्लीत सहकारी संस्थांच्या राष्ट्रीय परिषदेदरम्यान नव्यानं स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्रे, रुपे किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएमचं  वितरण देखील त्यांच्या हस्ते होणार आहे. ‘सहकार से समृध्दी’ अंतर्गत नव्यानं स्थापन झालेल्या बहुउद्देशीय संस्थांमध्ये पतसंस्था, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा समावेश आहे.

<><><><><>

नक्षलवादाविरोधात निकराची लढाई करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज नागपूर इथं एका  पत्रकार परिषदेत बोलत होते.  गडचिरोली ही भारताची दुसरी स्टील सिटी होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.  मागच्या कार्यकाळात आपण  विदर्भात सिंचनाचे ८० प्रकल्प पूर्ण केले याशिवाय पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्राचे प्रकल्प देखील पूर्ण केले. ऊर्जा विभागाचा मंत्री म्हणून त्या क्षेत्रातल्या पुढच्या पंचवीस वर्षाचा रोड मॅप तयार असल्याचा उल्लेख त्यांनी केला. पुढच्या दोन वर्षात उद्योगासहित सर्वच प्रकारच्या

विजेचे दर कमी करता येतील, अशी व्यवस्था निर्माण करण्यावर आपला भर असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड बाईट......**

विधानसभा निवडणुकीत जनतेने बहुमत दिलं त्याबरोबर अपेक्षाही आल्या आहेत आणि आपली जबाबदारी वाढली आहे, असं ते म्हणाले. सहा नदीजोड प्रकल्पांमुळे महाराष्ट्राचा कायापालट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हमीभावासंदर्भात इतर राज्यांच्या धोरणाचा अभ्यास केला जाईल असं सांगून कापूस आणि सोयाबीन यासह अन्य पिकांच्या खरेदीत सुलभता आणण्याचा सरकारचा विचार असल्याचं ते म्हणाले.

एकूणच केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्राला वेगानं पुढे नेण्याचा आपला प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. पीएम आवास योजनेअंतर्गत एका वर्षात विक्रमी संख्येने वीस लाख घरे देण्यात येत आहेत, असं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

देशभरात नाताळचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. गोव्यामध्ये धार्मिक वातावरणात नागरिक उत्सवाचा आनंद घेत आहेत. दोडोल, केक, बेबिंका यांसारख्या गोव्याच्या स्वादिष्ट पदार्थांनी दुकानं फुलून गेली आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना नाताळ निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबईत ख्रिस्ती बांधवानी काल मध्यरात्री प्रार्थनागृहांमधे भक्तिमय वातावरणात येशू ख्रिस्ताचा जन्म सोहळा साजरा केला. नाताळ निमित्त

शहरात आणि ख्रिस्ती वस्त्यांमध्ये  सजवलेले  ख्रिसमस ट्री आणि  येशू ख्रिस्ताच्या जन्माचे देखावे उभारण्यात आले आहेत.

**<><><><><>**

राज्यातही ख्रिसमस मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.

**धुळे शहरात** शहरातील विविध चर्चमध्ये मध्यरात्री प्रभू येशुच्या जन्माचं स्वागत करण्यात आलं. सेंट ऍन्स कॅथोलिक चर्च इथं आज सकाळी विशेष प्रार्थना सभा झाली. यावेळी सर्व धर्म प्रतिनिधींच्या उपस्थितीत केक कापून एकमेकांना नाताळाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार डॉ.शोभा बच्छाव, आमदार अनुप अग्रवाल, फादर विल्सन रॉड्रिग्ज, जोसेफ मलबारी उपस्थित होते. **नाशिक शहरा**तल्या विविध चर्चेसमध्ये काल मध्यरात्री येशू जन्म उत्साहात साजरा करण्यात आला.

**<><><><><>**

१९ व्या 'मोहम्मद रफी' पुरस्काराचं  वितरण काल मुंबईत  राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते  झालं. हिंदी चित्रपट सृष्टीतले लोकप्रिय गीतकार मजरुह सुलतानपुरी यांना यंदाचा 'मोहम्मद रफी जीवनगौरव पुरस्कार'  मरणोत्तर देण्यात आला.

**//<><><><><>//**